आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२५ मे २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाची अर्थव्यवस्था अंतर्गत पातळीवर मजबूत आहे, मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावर भूराजकीय आणि आर्थिक संघर्षामुळे नवनवी आव्हानं निर्माण होत आहेत असं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

- गेल्या १५ मे पासून पेट्रोल आणि डिझेलची चौथ्यांदा दरवाढ

- राष्ट्रपतींच्या हस्ते आज दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात यंदाच्या पद्म पुरस्कारांचं वितरण

**आणि**

- महाराष्ट्रात दोन वेगवेगवेगळ्या रस्ते अपघातात १३ जणांचा मृत्यू/ २५ जण जखमी

**<><><><><>**

देशाची अर्थव्यवस्था अंतर्गत पातळीवर मजबूत आहे, मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावर भूराजकीय आणि आर्थिक संघर्षामुळे नवनवी आव्हानं निर्माण होत आहेत असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. सिडबी म्हणजे स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया च्या ३७व्या वर्धापनदिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. विशेषतः पश्चिम आशियातला संघर्ष पेटल्यानंतर खतं, सोनं, इंधन या सर्व उत्पादनांचे आंतरराष्ट्रीय बाजारातले दर कडाडले असून त्यामुळे देशाच्या परकीय चलनसाठ्यावर ताण येतो. अशा परिस्थितीत सोनं खरेदी करु नये, खतांचा वापर कमी करावा, इंधनाची काटकसर करावी, परदेशप्रवास शक्यतो करु नये अशी आवाहनं प्रधानमंत्र्यांनी जनतेला केली आहेत. त्याबाबत विरोधक अपप्रचार करत असल्याचं त्या म्हणाल्या….

- **- होल्ड- बाईट- सीतारामन - -**

- **<><><><><>**

पेट्रोल आणि डिझेलचे दर आज अनुक्रमे २ रुपये ६१ पैसे आणि २ रुपये ७१ पैशांनी वाढले. गेल्या दोन आठवड्यातली पेट्रोल-डिझेलची ही चौथी दरवाढ आहे. या वाढीनंतर मुंबईत पेट्रोलचे दर १११ रुपये २१ पैसे प्रति लिटर तर डिझेलचे दर ९७ रुपये ८३ पैसे प्रति

लिटर झाले आहेत. दिल्लीत पेट्रोल १०२ रुपये १२ पैसे आणि डिझेल ९९ रुपये ५१ पैसे प्रति लिटर दराने मिळेल.

१५ मे पासून आजपर्यंत चारदा पेट्रोल आणि डिझेलची दरवाढ झाली असून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ७ रुपयांपेक्षा जास्त वाढ झाली आहे. एप्रिल २०२२ नंतरची ही सर्वात मोठी वाढ आहे. अमेरिका - इराणच्या युद्धामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाचे दर वाढल्यामुळे पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढत असल्याचं सांगितलं जात आहे.

<><><><><>

महिन्याभरात चौथ्यांदा झालेल्या इंधन दरवाढीबद्दल लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी सरकारवर टीका केली आहे. आपण अनेक महिन्यांपासून अर्थिक संकट येईल असा इशारा देत होतो, असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

इराणबरोबर कोणताही करार घाईनं करू नये असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी अमेरिकन प्रतिनिधींना सांगितलं आहे. अमेरिकन प्रसारमाध्यमांनुसार, चर्चेत असलेल्या या करारामध्ये ६० दिवसांच्या शस्त्रसंधीला मुदतवाढ, होर्मुझची सामुद्रधुनी खुली करणं आणि इराणच्या अणुकार्यक्रमावर निर्बंधांबाबत वाटाघाटी यांचा समावेश आहे.

<><><><><>

इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी गुप्त ठिकाणी रवाना झाल्याचं वृत्त अमेरिकन गुप्तवार्ता विभागाच्या हवाल्याने वृत्तसंस्थेनं दिलं आहे. इस्राएलने चालवलेल्या ऑपरेशन एपिक फ्यूरी दरम्यान मोजतबा खामेनी जखमी झाले असून त्यांना कडक सुरक्षाव्यवस्थेत ठेवण्यात आलं आहे. इस्राएल आणि अमेरिकेबरोबर संघर्ष सुरु झाल्यानंतर आजपर्यंत मोजतबा खामेनी जनतेसमोर आलेले नाहीत.

<><><><><>

क्वाड देशांच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची बैठक उद्या नवी दिल्ली इथं होणार आहे. अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्को रुबियो, ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री पेनी वाँग आणि जपानचे परराष्ट्र व्यवहार मंत्री तोशिमित्सु मोतेगी या बैठकीत सहभागी होतील. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर या बैठकीचं अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. महत्त्वाच्या मुद्द्यांवर

क्वाड देशांचं परस्पर सहकार्य वाढवण्याबाबत यावेळी चर्चा होईल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने सांगितलं आहे.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आणि अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी काल नवी दिल्लीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली. दोन्ही नेत्यांनी भारत-अमेरिका धोरणात्मक भागीदारी भक्कम असल्याचा पुनरुच्चार केला आणि व्यापार, ऊर्जा, गतिशीलता तसंच प्रादेशिक सुरक्षितता यांसारख्या सहकार्याच्या प्रमुख क्षेत्रांची रूपरेषा मांडली.

शिष्टमंडळ स्तरावरील चर्चेनंतर आयोजित पत्रकार परिषदेला संबोधित करताना, डॉक्टर जयशंकर यांनी व्यापार करार लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता अधोरेखित केली; ऊर्जा व्यापारातील विस्ताराचं स्वागत केलं; आणि भारताच्या ऊर्जा सुरक्षिततेसाठी ऊर्जेचा पुरवठा विविध स्त्रोतांद्वारे होणं अत्यंत महत्त्वाचं असल्याचं सांगितलं.

इराणमधील संघर्षाच्या संदर्भात बोलताना जयशंकर म्हणाले की, जागतिक इंधनाचे दर कमी राहावेत आणि व्यापार-उदीम निर्विघ्नपणे सुरू राहावा, यामध्ये भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांचं हित सामावलेलं आहे. अमेरिका, इस्रायल, इराण आणि इतर आखाती देशांसोबतही भक्कम संबंध असलेला भारत जगातील मोजक्याच देशांपैकी एक असल्याचं जयशंकर यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी आज सकाळी ताजमहालला भेट दिली. विशेष विमानाने आग्रा इथल्या खेरिया विमानतळावर सकाळी दहा त्यांचं आगमन झालं. रुबियो चार दिवसांच्या भारतदौऱ्यावर आहेत. क्वाड मंत्रीपरिषदेत सहभागी होण्यासाठी उद्या ते नवी दिल्लीला परतणार आहेत. त्याआधी ते जयपूरलाही भेट देणार आहेत.

**<><><><><>**

पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित होण्याची शक्यता वाढल्यानं कच्च्या तेलाचे भाव काहीसे नरमले आहेत. मे महिन्यात प्रथमच ब्रेंट क्रूड प्रतिबॅरल १०० डॉलर पेक्षा कमी दरावर उतरलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज राष्ट्रपती भवनात आयोजित कार्यक्रमात यंदाच्या पद्म पुरस्कारांचं वितरण करतील. आजच्या सोहळ्यात राष्ट्रपती  ६६ मान्यवरांना 'पद्म' सन्मान प्रदान करतील. यात दोन 'पद्मविभूषण', सहा 'पद्मभूषण' आणि ५८ 'पद्मश्री' पुरस्कारांचा समावेश आहे. यंदा पाच 'पद्मविभूषण', १३ 'पद्मभूषण' आणि ११३ 'पद्मश्री' पुरस्कारांसह एकंदर १३१ मान्यवरांना 'पद्म' सन्मान जाहीर झाले आहेत.   उर्वरित 'पद्म' पुरस्कार विजेत्यांना, नंतर आयोजित केल्या जाणाऱ्या समारंभाच्या दुसऱ्या टप्प्यात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

आजच्या सोहळ्याचं थेट प्रक्षेपण आकाशवाणीवरुन संध्याकाळी पाच वाजल्यापासून ऐकायला मिळेल. आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन दररोज संध्याकाळी ५ वाजता प्रसारित होणारं बातमीपत्र या कार्यक्रमाच्या आधी ४ वाजून ५७ मिनिटांनी प्रसारित होईल.

**<><><><>**

राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं येत्या गुरुवारी २८ मे रोजी नियोजित सामायिक विद्यापीठ प्रवेश परीक्षा पुढं ढकलली आहे. परीक्षेच्या सुधारित तारखा लवकरच जाहीर केल्या जातील, असं संस्थेनं सांगितलं आहे.

**<><><><>**

नीट परीक्षेच्या आयोजनात वारंवार त्रुटी राहत असल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने आज चिंता व्यक्त केली. याआधी पेपरफुटी होऊनही एनटीए ने त्यापासून काहीच धडा घेतला नाही हे खेदजनक आहे, अशी टिप्पणी न्यायालयाने केली. वैद्यकीय प्रवेश परीक्षा घेण्यासाठी एनटीए ऐवजी दुसऱ्या स्वायत्त संस्थेची स्थापना करावी, अशी मागणी करणाऱ्या याचिकेवरल्या सुनावणीवेळी न्यायाधीश न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने ही टिप्पणी केली. एनटीएच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी इस्त्रोचे माजी प्रमुख के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालच्या समितीने गेल्यावर्षी शिफारशी केल्या होत्या, त्याचं पालन कसं पालन केलं याचा तपशील गुरुवारपर्यंत सादर करण्याचे निर्देशही न्यायालयाने एनटीएला दिले आहेत.

नीट परीक्षा रद्द झाल्यामुळे २२ लाख विद्यार्थ्यांचं◌ं नुकसान झाल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला असून या परीक्षेवर देखरेख ठेवण्यासाठी निवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती स्थापन करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, याप्रकरणी पुण्यातून अटक केलेल्या भौतिकशास्त्र शिक्षिका मनिषा हवालदार यांना दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू न्यायलयात हजर करण्यात आलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात आज दोन वेगवेगळ्या अपघातात तेराजणांचा मृत्यू झाला. महाबळेश्वर आणि पोलादपूरला जोडणाऱ्या आंबेनळी घाटात पहाटे एक चारचाकी खोल दरीत कोसळून झालेल्या भीषण अपघातात ८ जण ठार झालेत. काही मृतदेह हाती लागले असून आणखी शोध सुरू आहे. हर्णे बंदर इथं फिरायला गेलेले सातारा जिल्ह्यातले आठजण या गाडीने परतत असताना चालकाचा ताबा सुटून हा अपघात झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्द्ल दुःख व्यक्त केलं आहे. मदतकार्यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रत्येकी सात जणांची पाच पथकं तयार केल्याचंही त्यांनी सांगितलं. वाहन खोल दरीत कोसळल्याने मृतदेहांचा शोध घेण्यासाठी एनडीआरएफची मदत घेतली जात आहे.

दुसरा अपघात मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर धुळे तालुक्यातल्या लळिंग घाटात झाला. भरधाव रेतीचा डंपर समोरुन येणाऱ्या ट्रकला धडकला त्याच वेळी ट्रकच्या मागून आलेले वाहनही ट्रकला धडकले. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला तर पंचवीस जण जखमी झाले आहेत. दरम्यान, अपघातस्थळी मदतकार्य करत असताना लळिंग टोल नाक्यावरील काही कर्मचाऱ्यांचाही अपघात झाल्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून मदत तसंच अपघातस्थळी सुरक्षा उपाययोजना अशा मागण्या प्रशासनाकडे केल्या आहेत.

**//<><><><><>//**